Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 21ST APRIL 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८९८ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असेः—

### सन १८९८ चा आक्ट ४ था.

**हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थी हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास, सन १८९८ चा, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट, असें ह्मणावें ; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सन १८६० चा आक्ट ४५ याच्या ४ थ्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

२. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, याचें ४ थें कलम यावरून रद्द केलें आहे, आणि त्याबद्दल खालील कलम दाखल केलें आहे. तें येणेंप्रमाणेंः—

परमुलकी अपराधांस हा कायदा लागू होणें.

"४. तसेंच या कायद्याचे ठराव—

(१) राणीसाहेबांच्या हिंदुस्थानांतील कोणत्याही देशी रयतेनें, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाच्या बाहेरील व पलीकडील कोणत्याही जागीं,

(२) दुसऱ्या कोणत्याही ब्रिटिश रयतेनें, हिंदुस्थानांतील कोणत्याही देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलखांच्या आंत,

(३) राणीसाहेबांच्या कोणत्याही नोकरानें, मग तो ब्रिटिश रयत असो किंवा नसो, हिंदुस्थानांतील कोणत्याही देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलखांच्या आंत,

केलेल्या कोणत्याही अपराधास लागू आहेत.

**व्याख्या.**—या कलमांतील 'अपराध' या शब्दांत, जें जें कृत्य हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत केलें असतां त्याबद्दल या कायद्याअन्वयें शिक्षा करतां येईल, त्या त्या, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर केलेल्या कृत्याचा समावेश होतो.

**उदाहरणें.**

(अ) **अ** हा मजूर हिंदुस्थानांतील देशी रयत असून, उगंडामध्यें खून करतो. तर तो हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इन्साफ करतां व त्यावर खुनाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(ब) **ब** हा युरोपियन ब्रिटिश रयत असून, काश्मिरांत खून करतो. तर तो हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इन्साफ करतां व त्यावर खुनाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(क) **क** हा परमुलखी मनुष्य पंजाब सरकारच्या नौकरींत असून, झिंदमध्यें खून करतो. तर तो हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इन्साफ करतां व त्यावर खुनाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(ड) **ड** हा ब्रिटिश रयत इंदुरांत राहत असून, **इ** याला मुंबईंत खून करण्यास उत्तेजन देतो. तर खून करण्याविषयीं साह्य केल्याचा गुन्हा **ड**कडे आहे."

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर अपराध करण्याविषयीं त्या मुलखांत साह्य करणें.

३. हिंदुस्थानचा अपराध्यांस **शिक्षा** करण्याविषयीं **कायदा**, याच्या १०८ व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर अपराध करण्याविषयीं त्या मुलखांत साह्य करणें.

"१०८ अ. जें कोणतेंही कृत्य हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत केलें असतां अपराध होईल, तें त्या मुलखाच्या बाहेर व पलीकडे करण्याविषयीं जो मनुष्य त्या मुलखांत साह्य करतो, तो या कायद्याच्या अर्थाप्रमाणें अपराध करण्याविषयीं साह्य करतो असें समजावें.

**उदाहरण.**

**अ** हा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत असून, गोव्यांत असणाऱ्या **ब** या परमुलखी मनुष्यास गोव्यांत खून करण्याविषयीं उत्तेजन देतो. तर खून करण्याविषयीं साह्य केल्याचा गुन्हा **अ**कडे आहे."

सन १८६०चा आक्ट ४५, कलम १२४ अ, याच्याबदला नवीन कलम दाखल करणें.

४. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा **कायदा** याचें कलम १२४ अ हें यावरून रद्द केलें आहे, आणि त्याबद्दल खालील कलम दाखल केलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

दंगा.

"१२४ **अ.** जो कोणी, राणीसाहेबांविषयीं किंवा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतल्या मुलखांत कायद्यावरून जो अमल स्थापलेला आहे त्याविषयीं द्वेष किंवा तिरस्कार किंवा बेदिली, बोललेल्या किंवा लिहिलेल्या, शब्दांनीं, किंवा खुणांनीं, किंवा प्रत्यक्ष कांहीं दाखवून, किंवा इतर रीतीनें, उत्पन्न करील किंवा उत्पन्न करण्याचा यत्न करील, त्यास जन्मपर्यंत किंवा त्याहून कोणत्याही कमी मुदतीपर्यंत काळेपाण्यावर पाठवि-

ण्याची शिक्षा केली पाहिजे व आणखी दंडही करतां येईल, किंवा पराकाष्ठा तीन वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा केली पाहिजे व आणखी दंडही करतां येईल, किंवा दंड केला पाहिजे.

**व्याख्या १.**—'बेदिली' या संज्ञेंत राजद्वेषाचा व सर्व प्रकारच्या वैरभावाचा समावेश होतो.

**व्याख्या २.**—सरकारच्या योजनेंत कायदेशीर साधनानें फेरफार करवून घेण्याच्या हेतूनें, द्वेष, तिरस्कार किंवा बेदिली उत्पन्न केल्यावांचून किंवा उत्पन्न करण्याचा यत्न केल्यावांचून, त्या योजनेविषयीं नापसंती दर्शविण्याकरितां केलेली टीका या कलमाअन्वयें अपराध होत नाहीं.

**व्याख्या ३.**—द्वेष, तिरस्कार किंवा बेदिली उत्पन्न केल्यावांचून किंवा उत्पन्न करण्याचा यत्न केल्यावांचून, सरकारच्या, कारभारसंबंधी किंवा इतर, कृतीविषयीं नापसंती दर्शविण्याकरितां केलेली टीका या कलमाअन्वयें अपराध होत नाहीं."

५. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १५३ व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:—

सन १८६० चा आक्ट ४५, ह्याच्या १५३ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

वर्गावर्गांच्यादर्म्यान वैर वाढविणें.

"१५३ अ. जो कोणी, बोललेल्या किंवा लिहिलेल्या शब्दांनीं किंवा खुणांनीं, किंवा प्रत्यक्ष कांहीं दाखवून, किंवा इतर रीतीनें, राणीसाहेबांच्या रयतेपैकीं निरनिराळ्या वर्गांच्यादर्म्यान वैरभाव किंवा द्वेषभाव वाढवील किंवा वाढविण्याचा यत्न करील, त्यास पराकाष्ठा दोन वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे, किंवा दंड केला पाहिजे, किंवा ह्या दोन्ही शिक्षा केल्या पाहिजेत."

"**व्याख्या.**—ज्या गोष्टींच्या योगें, राणीसाहेबांच्या रयतेपैकीं निरनिराळ्या वर्गांच्यादर्म्यान वैरभाव किंवा द्वेषभाव उत्पन्न होत असेल किंवा उत्पन्न होण्याकडे ज्यांचा झोंक असेल त्या गोष्टी, दुष्ट इरादावांचून व त्या दूर व्हाव्या अशा खऱ्या हेतूनें, दाखविणें हें या कलमाच्या अर्थाप्रमाणें अपराध होत नाहीं."

६. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याचें कलम ५०५, हें यावरून रद्द केलें आहे आणि त्यावद्दल खालील कलम दाखल केलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

सन १८६०चा आक्ट ४५, ह्याच्या ५०५ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

"५०५. जो कोणी—

साधारण सर्व लोकांसंबंधी अपक्रिया घडे असा मजकूर.

(अ) राणीसाहेबांच्या फोजेंतील किंवा आरमारावरील किंवा रॉयल इंडियन मरीनमधील किंवा इंपीरियल सर्व्हिस ट्रूप्समधील कोणत्याही अमलदारानें, शिपायानें किंवा खलाशानें बंड करावें किंवा असा अमलदार, शिपाई किंवा खलाशी या नात्याच्या आपल्या कामाकडे इतर रीतीनें दुर्लक्ष करावें किंवा तें काम करूं नये ह्या इरादानें, किंवा

(ब) साधारण सर्व लोकांस किंवा साधारण सर्व लोकांपैकीं कोणत्याही भागास भय किंवा धास्ती पडून राज्याच्याविरुद्ध किंवा साधारण सर्व लोकांच्या स्वस्थपणाच्याविरुद्ध अपराध करण्यास कोणा मनुष्यानें प्रवृत्त व्हावें ह्या इरादानें, किंवा

(क) कोणत्याही वर्गांतील किंवा मंडाळींतील मनुष्यांस, दुसऱ्या कोणत्याही वर्गाविरुद्ध किंवा मंडळीविरुद्ध कोणताही अपराध करण्यास प्रवृत्त करण्याच्या इराद्यानें,

किंवा सदरीलप्रमाणें परिणाम घडण्यासारखा, कोणताही मजकूर, आवई किंवा बोलवा सांगेल, प्रसिद्ध करील किंवा पसरील, त्यास पराकाष्ठा दोन वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा केली पाहिजे, किंवा दंड केला पाहिजे, किंवा ह्या दोन्ही शिक्षा केल्या पाहिजेत.

**अपवाद.** असा कोणताही मजकूर, आवई किंवा बोलवा सांगणाऱ्या, प्रसिद्ध करणाऱ्या किंवा पसरणाऱ्या मनुष्यास जेव्हां असा मजकूर, आवई किंवा बोलवा खरी आहे असें वाटण्याला वाजवी सबबी असतील, आणि तो मनुष्य असा मजकूर, आवई किंवा बोलवा, सदरीं सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही इराद्यावांचून, सांगेल, प्रसिद्ध करील किंवा पसरील, तेव्हां असें करणें ह्या कलमाच्या अर्थाप्रमाणें अपराध होत नाहीं."

जे. एम्. म्याक्फर्सन,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.